## * समर्पण *

*"ज्यांनी मान उंचावण्याचे बळ दिले*
*उच्च शिक्षण घेण्याचा आग्रह धरला*
*प्रबंधिका लिहिताना कौतुक केले*
*हाताच्या पोटावर मोलमजुरी करून*
*मला मोठे केले, शिक्षण दिले त्या*
*माझ्या पूज्य आई–वडिलांना व*
*काका–काकी, आजी–आजोबा यांना...."*

*****

# ऋणनिर्देश

**''तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा या चरित्राचा वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास''** ही लघुप्रबंधिका एम्.फिल्. (मराठी) या पदवी परीक्षेसाठी सादर करताना मला आनंद होत आहे. संशोधनकार्यात मला अनेकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. त्या सर्वांची मी ऋणी आहे. त्यांचे ऋण व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

प्रस्तुत लघुप्रबंधिकेच्या अभ्यासासाठी मार्गदर्शक म्हणून मला 'देवचंद महाविद्यालयातील मराठी विभागाचे विभागप्रमुख आदरणीय प्रा.डॉ. अच्युत माने हे लाभले. त्यांनी मला माझ्या विषय निवडीपासून प्रबंधिका पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी सखोल मार्गदर्शन केले. संशोधन करताना कोणकोणती पुस्तके कशी अभ्यासायची, तसेच अवांतर वाचनाचा विस्तार कसा वाढवायचा, याचे दिशादर्शन केले. या मार्गदर्शनाचा संशोधनासाठी मला अतिशय चांगला उपयोग झाला. या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे आणि त्यांच्या ऋणातच राहणे अधिक पसंत करीन. पुढील काळातही त्यांचे असेच मार्गदर्शन मिळत राहो, अशी पेक्षा करते.

तसेच, प्रा. डॉ. कृष्णा किरवले, प्रा.डॉ. विश्वनाथ शिंदे, प्रा.डॉ. रवींद्र ठाकूर, प्रा.डॉ. रणधीर शिंदे, प्रा. हिमांशू स्मार्त, प्रा. शरद गायकवाड, यांनी जाणीवपूर्वक प्रबंधिकेच्या लेखनाविषयी चौकशी करून प्रोत्साहन दिले. त्यांचीही मी ऋणी आहे. त्याचबरोबर माझ्या शैक्षणिक प्रवासात दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम करणारे माझ्या रूकडी कॉलेजचे प्राचार्य डॉ. अर्जुन राजगे, प्रा.डॉ. गिरीश मोरे, प्रा.डॉ. लता मोरे, प्रा. माधवी सोळांकूरकर, प्रा.डॉ. खंडेराव शिंदे, प्रा यू.आर. पाटील, प्रा. शर्मिला साबळे, प्रा. संकपाळ सर, प्रा. ए.एस्. पाटील, प्रा. प्रशांत

कांबळे, प्रा. देसाई सर, प्रा. दळवी सर यांचीही मी ऋणी आहे. तसेच 'तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा' या पुस्तकाचे लेखक योगिराज बागूल यांनीही मला या पुस्तकाची परीक्षणे देऊन व मला वेळोवेळी पत्रव्यवहार करून मोलाचे मार्गदर्शन केले आणि प्रबंधलेखनासाठी प्रोत्साहन दिले. त्याबद्दल त्यांचीही मी शतश: आभारी आहे.

सदैव कोणत्याही कामासाठी माझ्या पाठीवर कौतुकाची थाप देणारे व तितक्याच कर्तव्यदक्षपणे माझ्या चुका निदर्शनास आणून देणारे माझे आई-वडील सौ. ललिता (ताई) व श्री. भिमराव (बापू) यांचे कष्ट व प्रोत्साहनाशिवाय ही माझी प्रबंधिका पूर्णच होऊ शकली नसती. या माझ्या आईवडिलांच्या हाताचे बोट धरून मी शाळेची पहिली पायरी चढले आणि त्यांच्याच हाताच्या आधाराने मी ग,म,भ,न ही अक्षरं शिकले, आजही तेच हात ही संशोधनाची प्रबंधिका पूर्ण होत असतानाही शेतात राबत आहेत. म्हणूनच ही प्रबंधिका वेळेत पूर्ण करण्याचे बळ मला मिळाले.

एम्.फिल्. करीत असतानाच मी 'सेट'परीक्षा उत्तीर्ण झाले. याचे सर्व श्रेय मी माझ्या आईवडिलांना देते. कारण त्यांनी मोल-मजूरी करून हाताच्या पोटावर घर चालवून आम्हां सर्वांना शिकविले. पण आमच्या शिक्षणात कधीही खंड पडू दिला नाही. या माझ्या यशाचे खरे मानकरी तेच आहेत. त्यांच्या कष्टाचे सार्थक झाले असेच मी मानते. त्याचबरोबर ही प्रबंधिका लिहित असताना माझे मोठे काका-काकी सौ. भारती (मम्मी) व श्री. जयंत (पप्पा) यांनीही मला मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच माझी मोठी बहीण सौ. कविता व भाऊजी श्री. किरण, लहान बहीण सरिता, भाऊ अभिजीत, अमित तसेच चुलत बहीण-भाऊ, बहिणीचे सासू-सासरे व भाऊजी यांनी व अशा सर्वच नातलग-आप्तेष्टांनी मला मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले त्यांची मी सदैव ऋणी आहे.

या प्रबंधिकेच्या लेखनाच्या सुरुवातीपासून लेखन पूर्ण होईपर्यंत माझे सहकारी मित्र संदीप कांबळे, भीमसेन आवटे, गजानन अप्पिने, प्रदीप कांबळे, चंद्रकांत कदम, मारुती तुपिरे, प्रशांत गायकवाड, अनिल कांबळे, बळवंत मगदूम, गणेश गायकवाड, सतिश कांबळे, राजेंद्र लादे तसेच वनिता शिंदे, कमल कांबळे, अर्चना जाधव, वैशाली चौगुले यांच्याशी वेळोवेळी केलेली चर्चा मला महत्त्वपूर्ण ठरली. तसेच विभागातील श्री. विनय पाटील आणि श्री. सतिश कुसुंबे (मामा) यांचेही सहकार्य मिळाले. तसेच विशेष सहकार्य श्रीनिवास शिंदे यांचे मिळाले.

संशोधनासाठी ग्रंथ उपलब्ध होण्याचे ठिकाण म्हणजे शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय. या ग्रंथालयातील ग्रंथपाल व इतर कर्मचाऱ्यांनीही मला आवश्यक असलेले ग्रंथ वेळेत उपलब्ध करून दिल्याने मी त्यांचीही आभारी आहे.

प्रबंधिकेचे सुसज्ज आणि पद्धतशीर टंकलेखन आणि छपाई वेळेत करून दिल्याबद्दल 'खाडे झेरॉक्स अॅण्ड कॉम्प्युटर्स, कागल' यांचीही मी आभारी आहे. एम्.फिल्.ची ही लघुप्रबंधिका पूर्ण करत असताना अशा अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्तींनी मला सहकार्य केले त्या सर्वांची मी मन:पूर्वक आभारी आहे.

**– कु. सविता भिमराव गायकवाड**

---